आजचे कार्यक्रम

* निवृत्त पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांचा कृतज्ञता सोहळा. स्थळ : फ्रवशी टाऊन ॲकॅडमी जुने बॉईज टाऊन पब्लिक स्कूल
वेळ : सायंकाळी पाच वाजता.

* आरएम ग्रुपतर्फे गायक महंमद रफी यांच्या जयंतीनिमित्त 'एक शाम रफी के नाम' गाण्यांचा कार्यक्रम
स्थळ : कालिदास कलामंदिर, शालिमार.
वेळ : सायंकाळी सहा वा.

आजपासून अंतिम कसोटी

भारताला बरोबरी साधण्याची संधी

केनिंगटन । वृत्तसंस्था

भारत विरुद्ध इंग्लंड क्रिकेट संघांमध्ये सध्या ५ कसोटी क्रिकेट सामन्यांची मालिका सुरू असून, या मालिकेत भारतीय क्रिकेट संघ २-१ ने पिछाडीवर आहे.

उद्यापासून अखेरचा सामना खेळविण्यात येणार आहे.मालिकेत बरोबरी साधण्यासाठी भारतीय क्रिकेट संघ सज्ज झाला आहे. अखेरच्या सामन्यात विजय संपादन करून मालिका खिशात टाकण्यासाठी इंग्लंड क्रिकेट संघाचा प्रयत्न असणार आहे.

आज ,बुधवारी इंग्लंड क्रिकेट संघाने आपला अंतिम ११ खेळाडूंचा संघ जाहीर केला आहे.

पाचव्या कसोटी क्रिकेट सामन्यातून जलदगती गोलंदाज जसप्रीत बुमराहने माघार घेतली आहे.तसेच यष्टीरक्षक फलंदाज रिषभ पंतला मँचेसटर येथील ऑल ट्रॅफर्ड क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या सामन्यात दुखापत झाली होती. त्यामुळे भारतीय संघ व्यवस्थापनाने नारायण जगदीशनला पर्यायी यष्टीरक्षक फलंदाज म्हणून स्थान दिले आहे. तसेच ध्रुव जुरेलही संघात सामील असल्याने भारतीय संघ व्यवस्थापनासमोर संघ निवड करण्याचे मोठे आव्हान असणार आहे. तसेच आकाशदिपही

दुखापतीतून सावरून संघात सामील झाला आहे. तो पूर्णपणे तंदुरुस्त झाल्याचे गौतम गंभीर यांनी सांगितले आहे. अर्शदिपसिंगही संघात असल्यामुळे त्यालाही पदार्पण करण्याची संधी मिळू शकते. त्याने ९ एकदिवसीय आणि ६३ टी २० सामने खेळले असून, एकदिवसीय सामन्यात १४ तसेच टी २० मध्ये ९९ गडी बाद केले आहेत. भारतीय क्रिकेट संघाच्या इंग्लंड विरुद्ध कसोटी क्रिकेट मालिकेसाठी जाहीर झालेल्या संघाचा भाग असलेल्या अर्शदिपसिंगला पहिल्या ३ सामन्यात संधी मिळाली नव्हती.मात्र चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या सरावादरम्यान त्याच्या हाताला दुखापत झाल्याने या मँचेसटर कसोटी क्रिकेट सामन्याला मुकावे लागले होते. भारतीय क्रिकेट संघाकडे अंशुल कंबोज आणि शार्दूल ठाकूर हे पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे भारतीय संघ व्यवस्थापन पाचव्या सामन्यात कोणते बदल करणार? हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे.

भारत विरुद्ध इंग्लंड क्रिकेट संघांमध्ये ५ कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतील पाचवा आणि शेवटचा सामना केनिंगटन ओव्हल लंडन येथे खेळविण्यात येणार आहे. पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत इंग्लंड क्रिकेट संघाने २-१ ने विजयी आघाडी घेतली आहे.अखेरच्या सामन्यात विजय संपादन करून मालिका खिशात टाकण्यासाठी इंग्लंड क्रिकेट संघाचा प्रयत्न असणार आहे.

आज,बुधवारी इंग्लंड क्रिकेट संघाने आपला अंतिम ११ खेळाडूंचा संघ जाहीर केला आहे. इंग्लंड क्रिकेट संघाचा नियमित कर्णधार बेन स्ट्रोक्सने उजव्या खांद्याला झालेल्या दुखापतीमुळे माघार घेतली आहे. त्यामुळे संघाचे कर्णधारपद ओली पोपकडे सोपविण्यात आले आहे. इंग्लंड क्रिकेट संघाने जाहीर केलेल्या संघात ३ बदल केले असून, यामध्ये जोफ्रा आर्चर,लियम डॉसन आणि ब्रायडन कार्स यांना विश्रांती देण्यात आली आहे.बदली खेळाडू म्हणून जेकब बेथेल, गस ॲटकिंसन आणि जॉश टंग यांना स्थान देण्यात आले आहे.

इंग्लंड क्रिकेट संघ : बेन डकेट, झॅक क्रावली, ज्यो रूट, ओली पोप, हॅरी ब्रुक, जेकब बेथेल,जेमी स्मीथ,गस ॲटकिंसन, जेमी ओव्हरटन, जॉश टंग.

टाकळी परिसरात ८० हजारांची घरफोडी

नाशिक । प्रतिनिधी

टाकळी रोड परिसरातील बंद फ्लॅटचा कडीकोयंडा तोडून चोरट्यानी ८० हजारांचा ऐवज चोरून नेला. विलास निवृत्ती पगार (४८, रा. निकम हौसिंग सोसायटी, रामदास स्वामीनगर, टाकळीरोड) यांच्या फिर्यादीनुसार, पत्नीसह ते सिन्नर येथे गेले असता मंगळवारी (दि.२९) सकाळी त्यांना चोरी झाल्याचे समजले. चोरट्यांनी घरातून ५० हजारांची सोन्याची पोत, १५ हजारांचे चांदीचे पैंजण आणि १५ हजारांची रोकड असा ८० हजारांचा ऐवज चोरून नेत घरफोडी केली. उपनगर पोलिसात घरफोडीचा गुन्हा दाखल आहे.

कोटकचा नवा फंड

मुंबई । कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडच्या वतीने कोटक ॲक्टिव्ह मोमेन्टम फंडाचे अनावरण करण्यात आले. ही ओपन-एंडेड इक्विटी स्कीम आहे. योजना सार्वजनिक गुंतवणुकीसाठी १२ ऑगस्ट २०२५ पर्यंत खुली राहणार आहे. प्रती शेअर उत्पन्न वाढ होणाऱ्या कंपन्यांना खासकरून ही सुविधा पुरवण्यात येणार आहे.

बिझनेस बँकेचा साडेसात टक्के लाभांश

नाशिकरोड । प्रतिनिधी

बिझनेस को ऑप बँकेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात झाली. बँकेचे व या सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष बसंत गुरनानी यांनी सभासदांना साडेसात टक्के लाभांश देण्यात येणार असल्याची घोषणा केली.

दत्त मंदिर, मोटवानी रोडवरील उत्सव हॉलमध्ये वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले. व्यासपीठावर बँकेचे उपाध्यक्ष अँड गोरखनाथ बलकवडे, जनसंपर्क संचालक पुरुषोत्तम फुलसुंदर, ज्येष्ठ संचालक वसंतराव नगरकर,विजय संकलेचा,अशोक तापडिया, श्रीनिवास लोया, पुनमचंद ठोळे, विजय चोरडिया, मोहन लाहोटी, नेमीचंद कोचर, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक भाबड उपस्थित होते.

संचालक, ज्ञात-अज्ञात सभासद यांचे निधन झाले, त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येऊन सभेला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर सर्वसाधारण सभेचे प्रास्ताविक बँकेचे अध्यक्ष बसंत गुरनानी यांनी केले. आभार जनसंपर्क संचालक पुरुषोत्तम फुलसुंदर यांनी व्यक्त केले.

स्थानिक भाव

सोने (प्रति १० ग्रॅम)	
२४ कॅरेट	९९,०००
२२ कॅरेट	९१,०८०
चांदी (प्रति किलो)	
११,५०००	

शेअर बाजार

सेन्सेक्स	८१,४८२
	(+१४४)
निफ्टी	२४,८७५
	(+३४)

नाशिकमध्ये 'व्ही'ची फाईव्हजी सेवा

मुंबई । देशातील आघाडीची टेलिकॉम कंपनी व्होडाफोन-आयडिया अर्थात 'व्ही'ची छत्रपती संभाजीनगर आणि नाशिकमध्ये फाईव्ह जी सेवा सुरू होणार आहे. महिन्याच्या सुरुवातीला 'व्ही'ने नागपुरात फाईव्ह जी सेवा सुरु केल्या. कंपनीच्या युजर्सना अधिक जास्त पर्याय आणि वृद्धिंगत अनुभव प्रदान करण्याचा उद्देश असल्याचे ऑपरेशन डायरेक्टर रोहित टंडन यांनी सांगितले.

पालेभाज्यांची आवक वाढली

नाशिक । प्रतिनिधी

नाशिकच्या मुख्य मार्केट यार्डात मेथी, कोथिंबीर, शेपू, कांदापात आणि पालकाच्या भाजीची आवक वाढलेली आहे. पावसामुळे भाज्यांच्या दर्जा खालावलेला असल्याने आणि आवक वाढ झालेली असल्याने दरात घट झाली आहे. कोथिंबीर, गावठी, हायब्रीड प्रकारानुसार आणि प्रतवारीनुसार ५०० ते ४००० आणि २५०० रुपये शेकडा दराने विक्री झाली. तर मेथीच्या जुड्यांची ४८ हजार ४०० जुडी आवक लिलावात कमीत कमी ५०० रुपये जास्तीत २४०० आणि सरासरी २००० रुपये दराने मेथीची विक्री झाली. कांदापात कमीत कमी २१००, जास्तीत जास्त ४८५० आणि सरासरी ३५०० रुपये शेकडा दराने विक्री झाली. शेपूचे दर ५०० रुपये , १६०० आणि १००० रुपये शेकडा दराने लिलावात उचलली गेली.

लाईफ केअर रोबोटिक जॉईंट रिप्लेसमेंट सेंटरचे आज उद्घाटन

नाशिक । लेखानगर येथील लाईफ केअर हॉस्पिटल येथे लाईफ केअर ॲडव्हान्स रोबोटिक जॉईंट रिप्लेसमेंट सेंटरचे उद्घाटन

गुरुवारी (३१जुलै) सायंकाळी ५.३० वाजता करण्यात येणार आहे. या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सुविधेमुळे रोबोटिक पद्धतीने सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया रुग्णांसाठी उपलब्ध होणार आहे.

स्वामीनारायण ट्रस्टचे मुख्य स्वामी पुज्य स्वामी महाव्रतदास, आर्ट ऑफ लिव्हिगचे इंटरनॅशनल टीचर स्वामी आनंद वैंशपायन यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

रोबोटिक जॉईंट रिप्लेसमेंट सेंटरचे नेतृत्व डॉ. भूषण देशमुख हे करणार आहेत. त्यांना १२ वर्षांहून अधिक कालावधीचा अनुभव असून, १३ हजारापेक्षा जास्त शस्त्रक्रिया त्यांनी केल्या आहेत. गुंतागुंतीच्या ऑर्थोपेडिक शस्त्रक्रिया, कर्करोगाशी निगडीत शस्त्रक्रिया त्यांनी यशस्वीरित्या केल्या आहेत.या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन लॅप्रोस्कोपिक सर्जन व फर्टीलिटी स्पेशालिस्ट,आर्ट ऑफ लिव्हिंगचे ॲपेक्स मेंबर, भाजप महाराष्ट्र वैद्यकीय आघाडीचे समन्वयक डॉ. उमेश मराठे यांनी केले आहे.

कालचे कांदा भाव

	आवक (क्विं.)	किमान	कमाल	सरासरी
लासलगाव	१२९१६	६००	१६११	१३२०
विंचूर	१०५२७	५००	१५४०	१३००
निफाड	५१००	५००	१४२५	१३००
सायखेडा	३९४०	८००	१४००	१२५०
पिंपळगाव	१३७००	८००	१९५१	१३५०

फळभाज्यांचे प्रती जाळी दर

	किमान	कमाल	सरासरी
टेमॅटो	४००	१३००	१००
वांगी	१००	२१०	१८०
फ्लॉवर	९०	१८०	१५०
कोबी	८०	२००	१२०
ढोबळी	३००	५००	४००
भोपळा	१३०	२४०	१९०
कारले	२५०	४५०	३५०
दोडका	३००	६००	५००
गिलके	२५०	४००	३९०
भेंडी	३००	४००	३५०
काकडी	२५०	५००	३८०

पान १ वरून .....

मालेगाव बॉम्बस्फोटाचा आज निकाल

विशेष सरकारी वकील म्हणून अविनाश रसाळ आणि त्यांची मुलगी अनुश्री रसाळ यांनी काम पाहिले. सरकार पक्षाची सारी बाजू प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, आणि परिस्थितीजन्य पुराव्यांवर अवलंबून आहे. ज्यात आरोपींचा कॉल डेटा रेकॉर्ड आणि त्यांच्या आवाजाचे नमुने समाविष्ट आहेत. तर प्रशांत मग्गू, रणजित सांगळे यांनी आरोपींची बाजू लढवत त्यांचा या प्रकरणाशी काहिही संबंध नसून एटीएसने त्यांना यात नाहक गोवल्याचा दावा केला आहे. त्यामुळे या बहुचर्चित खटल्यात आता मुंबई सत्र न्यायालयातील विशेष कोर्टाचे न्यायाधीश एल.के. लाहोटी काय निकाल देतात याकडे संपूर्ण देशाचे लक्ष आहे.

नाशिकच्या एसटीचा भार 'प्रभारीं'वर

कामगारांवर होत आहे. अनेक कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या रखडल्या आहेत. महामंडळाच्या निर्णयानुसार दरवर्षी पात्रताधारकांना पदोन्नती दिली जाते आणि त्यासाठीची यादीही तयार आहे, परंतु निर्णय होत नाहीये. तसेच, बदलीसाठी आलेल्या अनेक अर्जांवरही निर्णय न झाल्याने कर्मचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. काही कर्मचाऱ्यांना जाणीवपूर्वक त्रास देणे, खोट्या केसेस करणे किंवा निलंबित करणे असे प्रकार घडत असताना, विभाग नियंत्रकांची न्याय भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. पूर्णवेळ नियंत्रक नसल्याने अशा प्रकरणांमध्ये कामगारांना न्याय मिळत नसल्याची भावना आहे.

'पतंजली'तर्फे दिव्यांगांना मोफत कृत्रिम अवयव

हरिद्वार । पतंजली वेलनेस आणि नागपूरचे उद्धार जेफरीज यांच्या संयुक्त विद्यमाने पतंजली योगपीठात आयोजित दोन दिवशीय शिबिरात दिव्यांगांना मोफत कृत्रिम अवयव प्रत्यारोपण करण्यात आले.

पतंजली योगपीठाचे संस्थापक रामदेव बाबा आणि महासचिव आचार्य बाळकृष्ण याप्रसंगी उपस्थित होते.शिबिरात २५० हून अधिक दिव्यांग लाभार्थींना कृत्रिम हात, पाय, कॅलिपर, बैसाख्या यांसारखी उपकरणे मोफत वितरित करण्यात आली. यावेळी रामदेव बाबा,आचार्य बाळकृष्ण यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आयोजन भगवान महावीर विकलांग सहायता समिती, उद्धार सेवा समिती, अनुभवी डॉक्टर, कुशल तंत्रज्ञ, आणि पतंजली सेवा विभागातील सेवाभावी कार्यकर्त्यांच्या सहकार्याने पार पाडण्यात आले. शिबिर यशस्वीतेसाठी संजय, रुचिका अग्रवाल, श्रुती, प्रधुमन, रवि, दिव्यांशु, कृष्णा, निहारिका, दिव्या, दीनदयाल आदींचे योगदान लाभले.

नामकोच्या जनसंपर्क संचालकपदी शितल भट्टड

नाशिक । दि नाशिक मर्चन्टस् को-ऑप बँकेच्या जनसंपर्क संचालक पदी शितल सुरज भट्टड यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

सातपूर येथे बँक सभागृहात संचालक मंडळाच्या बैठकीत ही निवड करण्यात आली. याप्रसंगी अध्यक्ष हेमंत धात्रक, ज्येष्ठ संचालक वसंत गिते, सोहनलाल भंडारी, प्रकाश दायमा, किशोर पाटील, किशोर वडनेरे, डॉ. सुजित गुंजाळ, बाळू कलंत्री, योगेश पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले.आभार उपाध्यक्ष सुभाष नहार यांनी मानले. कार्यक्रमास विजय साने, संचालक रंजन ठाकरे, अशोक सोनजे, महेंद्र बुरड, गणेश गिते, भानुदास चौधरी, नरेंद्र पवार, आकाश छाजेड, हरीष लोढा, ललितकुमार मोदी, अविनाश गोठी, प्रफुल्ल संचेती, प्रशांत दिवे, तानाजी जायभावे, संकेत पारख मुख्य कार्यकारी विश्राम दीक्षित, माजी नगरसेवक विलास शिंदे, जयप्रकाश जातेगांवकर आदी उपस्थित होते.

श्रीगुरुजी रुग्णालयातर्फे 'आवाज'वर कार्यशाळा

नाशिक । श्रीगुरुजी रुग्णालयाच्या वतीने भोसला इन्स्टिट्यूटच्या ऑडिटोरियममध्ये 'व्यावसायिक आवाज शिस्त आणि शास्त्र' या विषयावर कार्यशाळा झाली.

कार्यशाळेत ठाण्याच्या सुप्रसिद्ध व्हाइस थेरपिस्ट सोनाली लोहार यांनी आपला आवाज, त्याची ओळख, त्यासाठी घ्यावयाची काळजी, त्यासंबंधीचे व्यायाम आदि विषयाची शास्त्रशुद्ध पद्धतीने माहिती दिली. उद्घाटन सुप्रसिद्ध अभिनेते आणि निवेदक अभिजीत खांडकेकर यांच्या हस्ते झाले.

दोन सत्रात झालेल्या या कार्यशाळेत लोहार यांनी आवाज(स्वर) संस्थेतील विविध अवयव, त्यांचे कार्य यांची माहिती, प्रत्यक्ष व्यायाम , वॉर्म अप आणि कुलिंग टेक्निक्स सांगितल्या. अभिनेते, निवेदक अभिजीत यांनी रुग्णालयाच्या उपक्रमाचे कौतुक केले.ज्ञानेश कुलकर्णी यांनी परिचय, प्रास्ताविक,सूत्रसंचालन तर स्पीच थेरपिस्ट डॉ. गायत्री वैद्य यांनी आभारप्रदर्शन केले.यावेळी कार्यवाह प्रकाश भिडे, डॉ. तेजश्री जोशी, रुग्णालय समिती सदस्या, ज्येष्ठ भाषा आणि श्रवणविकार तज्ज्ञ माया सांघी उपस्थित होत्या.

शंकराचार्य न्यासाकडून विद्यार्थ्यांचा गौरव

नाशिक । प्रतिनिधी

एम.ए. व बी.ए. संस्कृत परीक्षेत पहिल्या तीन क्रमांकाने उत्तीर्ण विद्यार्थ्याचा शंकराचार्य न्यासातर्फे गौरव करण्यात आला.

कुर्तकोटी शंकराचार्य यांच्या स्मृत्यर्थ राज्यातील सर्व विद्यापीठातील संस्कृत विषयातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील प्रथम तीन विद्यार्थ्यांना दरवर्षी पारितोषिके

देण्यात येतात. त्यानुसार शौनक पिंपुटकर, शर्वरी एरंडे, स्वराली दातार यांना धनादेश पाठवून गौरविण्यात आले.

शब्दकोडे :३१५



आडवे शब्द : १) जोपर्यंत. ४) समजणे, जाणणे. ७) एखाद्याची मुले बाळे. ९) छिद्र. बीळ. ११) पालिकेतील लोकप्रतिनिधी. १२) बैलाच्या मानेवरील जोखड. १४) भडीमार. १५) दरोडा. १७) परदेशातून माल आणणे आणि परदेशात माल पाठवणे या बद्दलचा शब्द. १८) जमिन मोजण्याचे एक साधन. हत्ती. १९) भावाची पत्नी. २१) जाड मऊ पांघरूण. २३) मारझोड. २५) शाळेची पुस्तके छापणारी संस्था. २८) एकूण एक सर्व. २९) वडिलांचे मराठी संबोधन. ३०) फळातील पेय. ३२) ओझी वाहून उदरनिर्वाह करणारा. ३४) अखंड. ३५) जंगलातील आग. ३७) परत. ३९) पठण. ४१) सर्व सामान. ४४) मेणा, पालखी. ४६) जोडीतील एक चर्मवाद्य. ४८) मावा. ४९) सदोदित. ५०) अभिनेता. ५१) बोंब मारणे, जोरात ओरडणे. ५३) गावाचे प्रवेशदार. ५५) भक्कम, मजबूत. ५७) कलंक, डाग. ५८) बारीक मऊ केस. ६०) जास्तीत जास्त. ६१) ज्ञानेश्वरांना मुक्ताईने हा दरवाजा उघडण्यास सांगितले. ६३) पळसाचा डींक. ६५) तयार करणारा, परमेश्वर. ६६) बोबडी वळल्यानंतरची भाषा. ६८) श्रेष्ठ पुरुष. ६९)नवरदेव. ७१) पोत्याचा तुकडा. ७२) मनाला टोचणारे दुःख. ७३) शेतीतील उपकरण. ७४) अथवा, किंवा.

उभे शब्द : २) सिंहाची उपाधी. ३) अंगातील मस्ती, जोम. ४) हिंदी महासागरापासून हिमालयापर्यंत. ५) विळखा, मीठी. ६) सततची मागणीची भूणभूण. ८) कन्या, मुलगी. १०) इच्छलेले फळ देणारे झाड. १३) मंद वासर. १४) पत्ता, शोध, ठिकाणा. १६) निमित्त, १७) जनकजननी. २०) पाणी. २२) नियम, निश्चय. २४) आंब्याचा राजा. २६) व्याख्यान. २७) बाण, नदीचा काठ. २९) माळी. ३१) सरसकट. ३३) मर्कट. ३५) अरण्यवास. ३६) गाडचा उभ्या करण्याची जागा. ३७) प्राचीन, जुने. ३८) योग्य, उचीत. ४०) खंदक, फाळ. ४१) लहान मुलगी. ४२) अकबराचा सल्लागार. ४३) रक्षण करणे, सांभाळणे. ४५) निरुपाय. ४७) मोठे डोळे, कुरुप. ५२) चटकन, त्वरीत. ५४) सत्वयुक्त. ५६) टीमचा प्रमुख. ५९) दरवाजावरील पाहरेकरी. ६१) त्वरा, घाई. ६२) हात व दंड यांना जोडणारा भाग. ६४) मनाचा ओढा. ६५) गुहा. ६७) प्रतिष्ठा, अब्रु. ६९) नुतन. ७०) काढलेली सुट्टी.

शब्दकोड३१४चे उत्तर